सकाळ

# 'रवळनाथ'च्या सात शाखांना मंजुरी

## चौगुले : महाराष्ट्रासह कर्नाटकात विस्तार

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ३१ : येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या सात नव्या शाखांना मंजुरी मिळाली आहे. केंद्रीय निबंधकांनी (सहकारी संस्था) ही मंजुरी दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह कर्नाटकात संस्थेचा विस्तार वाढणार असल्याची माहिती संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

रवळनाथ सोसायटीच्या सध्या ११ शाखा कार्यरत आहेत. महाराष्ट्रात आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, कुडाळ, सांगली, पुण्यात, तर कर्नाटकात बेळगाव व निपाणी येथे शाखा आहेत. यातील सात शाखा स्वमालकीच्या इमारतीत आहेत. केंद्रीय निबंधकांनी शाखा विस्ताराच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पंढरपूर, सांगोला, तासगाव, बांदा, नवी मुंबई, तर कर्नाटकात धारवाड, चिक्कोडी येथे नव्या शाखा सुरू केल्या जाणार आहेत. या शाखांच्या कार्यक्षेत्रातील मध्यमवर्गीयांना घरकुलाचे स्वप्न साकार करण्यास मदत होणार असल्याचे श्री. चौगुले यांनी सांगितले.



**एम. एल. चौगुले**

संस्थेकडे १२ हजार सभासद असून, ४१५ कोटींच्या ठेवी आहेत. आतापर्यंत चार हजार घरांना ३०० कोटींपर्यंतचे कर्ज वितरण केले आहे. ग्राहकांना मोबाईल बँकिंग, एनईएफटी, आरटीजीएस, आयएमपीएस यासारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शाखा विस्तारासाठी संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाले. नव्या सातही शाखा लवकरच सुरू केल्या जाणार असल्याचेही श्री. चौगुले यांनी सांगितले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
01/11/2023 Page No. 3